सोलापूर विद्यापीठ
सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्ग,केगांव
सोलापूर- ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website : http://su.digitaluniversity.ac
EPABX No. : +91-0217-2744771,72,73,74,78,79

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

SOLAPUR UNIVERSITY
Solapur - Pune National Highway, Kegaon,
SOLAPUR - 413 255.(Maharashtra)
Fax : +91-0217-2744770

Ref.No. : SUS / Date :

संदर्भ क्र. सोविसो/कु.का./ 3851 दिनांक: 10 JUL 2014

प्रति,
**मा. प्राचार्य /संचालक / संस्था चालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,
सोलापूर विद्यापीठ.

विषय : **महाविद्यालये / संस्थांचे ई-मेल आयडी अद्यावत करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाची विविध पत्रे, परिपत्रके व बैठकांची माहिती विद्यापीठाकडून महाविद्यालयास पत्राद्वारे पाठविण्यात येते. सदरची माहिती लवकरात लवकर महाविद्यालयास मिळावी व त्यानुसार महाविद्यालयांना त्यावर वेळेत कार्यवाही करता यावी या उद्देशाने विद्यापीठाकडून सदरची पत्रे, परिपत्रके व बैठकांची माहिती ही महाविद्यालयांच्या ई-मेलवर पाठविण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच महाविद्यालयांचे ई-मेल आयडी अद्यावत नसल्यामुळे त्यांना पाठविलेले ई-मेल्स् बाऊन्स होतात. परिणामी, तातडीच्या परिस्थितीत संबंधित महाविद्यालयांना ही माहिती मिळत नाही. ही बाब लक्षात घेता, आपण आपल्या महाविद्यालयाचे ई-मेल आयडी अद्यावत करावेत अथवा नवीन ई-मेल आयडी तयार करुन हे ई-मेल आयडी, प्राचार्य / संस्था चालकांच्या मोबाईल क्रमांकासह हे पत्र प्राप्त होताच आठ दिवसात विद्यापीठाच्या कुलसचिव कार्यालयास पाठवावेत. तसेच अशा ई-मेल आयडीवर प्राप्त होणारे ई-मेल दररोज तपासण्यात यावेत. प्राचार्यांनी तातडीच्या परिस्थितीत माहिती मिळण्याकरिता त्यांचे वैयक्तिक ई-मेल आयडीदेखील पाठवावेत.

वरीलप्रमाणे माहिती कृपया वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(एस.के. माळी)
कुलसचिव